
# चित्राक्षरी








अरूण काकतकर

आसावरी काकडे

मिलिंद सबनीस

राम केळकर



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# चित्राक्षरी

(काव्यचित्रे)


अल्पाक्षरी : अरूण काकतकर

छायाचित्रकार : आसावरी काकडे,

मिलिंद सबनीस,

राम केळकर

# चित्राक्षरी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

चित्राक्षरी

अल्पाक्षरी : अरुण काकतकर
१२/०८, लक्ष्मीनारायण नगर, पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे ४११००४
भ्रमणध्वनि: ९१५८८८९४८८ ९८२२०२१५२१
E mail:  24ak47@gmail .com

छायाचित्रकार :
आसावरी काकडे
डी 1/3,स्टेट बँक नगर सोसायटी,कर्वेनगर,पुणे 411052
asavarikakade@gmail.com
Mob. No. 9762209028

मिलिंद सबनीस,
Ç-8, अथश्रि ,बावधन, pune-411021.
M - 9422318963
email - mish2812@gmail.com

राम केळकर
C/O प्रांजल केळकर. 206 आर के spectra. डीएसके रानवारा रोड पाटील नगर बावधन बुद्रुक पुणे ४११०२१.
Mob.no.8975234214 Email. rammrunal553@gmail.com

विशेष आभार : उषाताई मंगेशकर, सुकन्या कुलकर्णी मोने, सुहास बहुलकर

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखकाकडे, व छायाचित्रकारांकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २८ मे २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे पुस्तक इतर कोणत्याही वेबसाइटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त इतर कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## अरूण काकतकर



चार दृश्यांश.. लागोपाठ.. कल्पना करा.. एक दिवाणखाना सदृश जागा.. एका कॉफी-टेबल वर एक पुस्तक पडलंय.. त्यावर वेष्टण आहे.. त्याचंसमीप दृश्य.. एक व्यक्ती प्रवेशते.. सोफ्यावर बसून पुस्तक हातात घेते.. पुस्तक उघडून वाचायला सुरुवात करते.. व्यक्तीच्या खांद्यावरून पुस्तकाचं समीप दृश्य.. मजकुरावरून ते वाचकानं उलटं धरल्याचं दिसत.. वाचक पानं उलटत चाललाय.. एका पानावर एक चित्र दिसतं.. ते सुद्धा उलटं दिसतं.. पण वाचकाला चित्र उलटं आहे हे लगेच लक्षांत येतं आणि तो पुस्तक सुलटं करून चाळायला लागतो.. त्यांच्या चेहेऱ्यावर मंद स्मित ...

ही चित्रफीत मी अनेक वर्षांपूर्वी, साक्षरता अभियानांतर्गत कांहीं कार्यक्रम सादर करण्यापूर्वी पाहिली होती.. अक्षर साक्षरतेपेक्षा दृश्य साक्षरतेचे महत्त्व विषद करणारी..

तेंव्हा पासून माझ्या मनांत विचार धुमाकूळ घालायला लागले की या चित्रांना कांहीतरी सांगायच असतं.. ज्यांना अक्षरं कळत नाहीत त्यांची ज्ञानवृद्धी ती करूं पाहातांत..


त्यानंतर बऱ्यांच वर्षांनी म्हणजे २०१६ च्या मध्यापासून, कसा परिचय झाला आठवत नाही, पण कवयित्री आसावरी काकडे यांनी रोज एक स्वत: काढलेलं छायाचित्रं पाठवायला सुरुवात केली.. आणि त्या चित्राचं मनोगत माझ्या कल्पना आणि कुवतीनुसार लिहायला लगलो.. आशय उपलब्ध चौकटींतच बसवायचा असल्यानं, त्याला साहाजीकंच अल्पाक्षरींचं स्वरूप येत गेलं..

त्या मूक चित्रांना वाचा देण्याचा हा एक प्रयत्न..

गंमत म्हणजे शब्द माध्यमांतल्या कवयित्रीनं पाठवलेल्या दृश्यांकरिता मी दृश्यमाध्यमकर्मी, शब्दांची जोड द्यायला लागलो.. अशा या आगळ्या सहयोगाने गेल्या पांच वर्षांत आम्ही जवळपास दीड हजार चित्रशब्द चौकटी सादर केल्या..

त्यातल्या कांहीं निवडून रसिक वाचकांसाठी सादर करतोय..


अरुण काकतकर.
१२/०८, लक्ष्मीनारायण नगर,
पटवर्धन बाग, एरंडवणे,
पुणे ४११००४
भ्रमणध्वनि: ९१५८८८९४८८
९८२२०२१५२१
E mail:  24ak47@gmail .com


श्री अरूण काकतकर यांचे ई साहित्यवरचे

पहिले पुस्तक मनगुंफ़ी. मनाच्या गुहेचा शोध.

हे पुस्तक खालील लिंकवर मिळेल

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mangumfee_arun_kakatkar.pdf

## आसावरी काकडे

*छायाचित्र-कविता एक जुगलबंदी...*




छायाचित्र काढण्याची सुविधा असलेला मोबाईल हातात आल्यावर भराभर फोटो काढायला सुरूवात झाली. हळूहळू नजर आजूबाजूच्या ‘दृश्यां’मधे छायाचित्रांच्या चौकटी ठेवून पाहायला लागली. छायाचित्रं काढता काढता लक्षात येत गेलं की नजर जे अनुभवतेय त्यातलं फारच थोडं उतरतंय छायाचित्रात. जे हवं आहे त्याच्या बरोबर नको तेही येतंय अपरिहार्यपणे. जे येतंय तेही संकुचीत रूपात, रंग रूप बदलून येतंय. दोन दृश्यांमधलं अवकाश आक्रसून जातंय...

हे सर्व अनुभवताना आधी ‘चौकटीं’चं महत्त्व लक्षात आलं. मग हळूहळू मर्यादा जाणवू लागल्या. या मर्यादांनी ‘दृश्या’च्या असीम भव्यतेचं अवाक् करणारं भान दिलं आणि पाठोपाठ छायाचित्र टिपणाऱ्या नजरेचीच मर्यादा अधोरेखित केली... काय, किती, कसं पकडायचं छायाचित्रात हे ठरवता ठरवता लक्षात येत गेलं की ‘स्व’ची ही निवड ‘स्व’ची इयत्ता ठरवते आहे... या आकलनातून छायाचित्र-कवितांची निर्मिती झाली. ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीनेच ‘आकलनाच्या नव्या तिठ्यावर’ या नावानं त्याचं ईपुस्तक तयार झालं.

पण हे एवढ्यावरच थांबलं नाही. छायाचित्र काढण्याचा छंद चालूच राहिला. ‘सुप्रभात’ म्हणून मी एकेक छायाचित्र माझ्या ग्रुपमधील अनेकांना पाठवू लागले. त्यात दूरदर्शन वरील सर्जनशील निर्माते अरूण काकतकर एक होते. त्यांनी एकदा माझ्या एका छायाचित्रावर काही ओळी लिहिल्या. छायाचित्रात त्यांना जे जाणवलं ते त्यांनी शब्दबद्ध केलं होतं. मला वेगळंच काही दिसलं होतं. त्यांना प्रतिसाद म्हणून मीही दोन ओळी लिहिल्या. मग हे रोजच होऊ लागलं. रोजची सकाळ आनंदित करणारी ही जुगलबंदी गेले कित्येक दिवस चालू आहे. माझ्या

फोटो-दोन ओळींचा मी ब्लॉग तयार केला. श्री काकतकर त्यांच्या रचना असलेल्या छायाचित्रांचे 'चित्राक्षरी' या नावाने ईपुस्तक करत आहेत. त्यात माझ्या काही छायाचित्रांना स्थान मिळाले याचे मला समाधान वाटते आहे. त्यांच्या या आनंददायी निर्मितीला माझ्या हार्दिक शुभेच्छा.

आसावरी काकडे




आसावरी काकडे
डी 1/3,
स्टेट बँक नगर सोसायटी
कर्वेनगर
पुणे 411052

asavarikakade@gmail.com
Mob. No. 9762209028


आसावरी काकडे यांचे ई साहित्यवरचे

पहिले पुस्तक 'आकलनाच्या नव्या तिठ्यावर '

हे पुस्तक खालील लिंकवर मिळेल

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ant_asavari_kakade.pdf

# मिलिंद जयंत सबनीस.



आज मी 68 वर्षांचा आहे. परांजपे स्कीम मधील अथाश्री बावधन येथे राहतो. मूळचा मी मुंबईत वाढलेला आणि 1995 ला पुण्यात आलो. DME करून नंतर नोकरी व स्वतःचा व्यवसाय करून आता रिटायर झालो आहे. 5-6 वर्षांपूर्वी एका कार्यक्रमात पक्षी निरीक्षण या विषयावरील भाषणाने मी प्रेरित होऊन निरीक्षण आणि छायाचित्रण करण्यास सुरुवात केली. आतापर्यंत जवळजवळ 3000 च्या वर फोटो काढलेले आहेत. याच बरोबर मला जंगल भटकंतीची सुद्धा चटक लागली आणि वर्षतून 3-4 वेळा तरी मी जंगलात जातो.

मला चांगले चांगले फोटो मित्र आणि परिवार यांच्याबरोबर शेअर करून त्यांनाही आनंद द्यायला आवडतो. बरेचदा सकाळी मी एक फोटो सुप्रभात बरोबर टाकत असतो.

मिलिंद सबनीस, Ç-8, अथश्रि ,बावधन, pune-411021.

M - 9422318963

email - mish2812@gmail.com

## राम केळकर



माझे पूर्ण नाव शिवराम विनायक केळकर लहानपणापासूनच मला सर्व राम केळकर या नावानेच ओळखतात माझा जन्म कोकणातला मालगुंडचा मी रहिवासी एसएससी नंतर मुंबईला जाऊन ह चार वर्षे मरीन इंजिनीयरचा कोर्स केला सर्वप्रथम कोकण ला जाणाऱ्या बोटीवर कोकण सेवक या बोटीवर सहा महिने काम केले नंतर परदेशी जाणाऱ्या बोटीवर १६ वर्षे engineer म्हणून काम केले४५/५० देश पाहून झाले.मी सर्व प्रकारच्या बोटीवर काम केले. सोळा वर्षानंतर शोअरजॉब केला.अगदी वयाच्या ६३ पर्यंत. Shipping company madhe manager म्हणून काम केले.मला बालपण पासून चित्रकलेची आवड होती . टच स्क्रीन मोबाईल्स आल्या पासून मी मोबाईलवर पेंटिंग करायाल स्वतःच शिकलो.अगोदर मी कॉम्प्युटरवर देखील paint shop madhe चित्रे काढली आहेत.आत्ता RTD झाल्या पासून मोबाईल पेंटिंग करतो.साधारण पणे २०/२५ मिनिटात एखादे पेंटिंग होते मूड वरती अवलंबून असते. अजून अजून मधून मूड लागला तर चित्र काढतो. काही कॅनवास पेंटिंग पण केली आहेत. मागे एकदा पुण्याला ढोले पाटील रोड वरती श्रीयुत मंगेश तेंडुलकर यांनी माझे पेंटिंग प्रदर्शन पाहिले आहे त्यांनाही कला आवडली. श्रीयुत अरुण काकतकर हे माझे मी मरीन इंजिनियर करत असतानाचे मित्र. त्याने अजून मैत्री जपून ठेवले मला विसरले नाहीत ते भाग्य . ते निरनिराळया फोटोंवरून चारोळीचे काव्य करायचे ते पाहून मी त्यांना माझ्या काही पेंटिंग वर पण काव्य करायला सांगितले. आता पुण्यात रिटायर लाईफ जगतोय मुलं नातवंडं बरोबर.

राम केळकर, C/O प्रांजल केळकर. 206 आर के spectra. डीएसके रानवारा रोड पाटील नगर बावधन बुद्रुक पुणे ४११०२१. Mob.no.8975234214 Email. rammrunal553@gmail.com

।। श्री मंगेश ।।

Usha Mangeshkar

श्री. अरुण काकतकर.

सप्रेम नमस्कार

आपण पाठवलेली चित्रे फार सुरेख आहेत. व आपली – अल्पाक्षरी चित्रांना साजेलशी आहे.

आपले हे ई. पुस्तक ठाण्याची ई साहित्य प्रतिष्ठान ही प्रकाशन संस्था वितरीत करणार आहे. या संस्थेला व आपल्याला खूप खूप शुभेच्छा. आपले हे ई पुस्तक लवकर वितरित होवो. व लोकप्रिय होवो. ही प्रार्थना.

आपली.



101, Prabhukunj, Peddar Road, Mumbai - 400 026. Tel.: 2351 1414.

झंकार सोडुनी अपुरा गेली मीरा
इकतारा टाकुनि तसाच तिथे बिचारा
परि हरिची होती असह्य कसनुशि, ओढ
वेणूनादें ऊन्मळले अंतरि वेड
पाऊलखुणा देतील आजही साक्ष
मधुराभक्तीचे 'विरून जाणे' लक्ष.

-अरुण काकतकर.

चित्रकार- उषाताई मंगेशकर



निळा निळा कान्हा भाळी शुभ्र नाम टीळा
अवकाशी पूर्ण शशीं बिंबाचा सोहळा

डुचमळे जळ बिंब लाटांवर स्वार
धिटाईची चर्चा कौतुकानं रानभर

विस्तारतां परिघ  लाटेलाटेंत अंतर
बिंबांमनी थरकाप काळीज कापर

झुरुमुरु चांदवा अल्वार उतरला
धरेवर विसाव्याला जरा पहुडला

शहारली धरा जरा हव्याशा स्पर्शाने
तृणपाती अर्ध्याराती डोलली हर्षाने

**चित्रकार- उषाताई मंगेशकर**



नमस्कार



मी सुकन्या कुलकर्णी मोने.

आत्तापर्यंत आपण अनेक निसर्ग कविता वाचल्या, पण एखाद्या फुलांच्या फोटोवर, झाडांच्या फोटोवर कविता केलेलं स्मरतय का हो? त्या फुलांच्या काय भावना आहेत हे जाणून घेतलंय का हो आपण?

मी माझ्या झाडांशी पाणी घालताना रोज बोलते, गप्पा मारते मग ती छान बहरतात. पण त्यांच्या रुसव्या फुगव्याने त्यांचे रंग बदलतात, त्यांचे रंग आपल्याला खूप काही सांगून जातात, पानांच्या नैसर्गिक रचनेत भूमिती दडलेली दिसते हे आपण कधी बघितलं आहे का?

मला तरी वाटत नाही की ह्या नजरेने आपण कधी त्यांच्याकडे बघितलं आहे पण अरुण काकांनी मात्र बघितलं आणि अगदी सोप्प्या पण तरीही सुंदर भाषेत ते आपलया समोर सादर केलं आहे.

जाभळया रंगाच्या पाना फुलांची तर गम्मतच बरं का एकदा वाटतंय त्यांना की ते लाजून चूर होतंय तर दुसऱ्याच क्षणी म्हणतात कसे 'एवढा कसला राग आलाय बाई नीळं जाभळं व्हायला?.....'

पिवळया फुलांची पान लांब सडक, हिरवीगार तर त्याच्यात त्यांना ती त्रिमिती साधताना दिसतात, गोकर्णचं फुल तर आपल्याला गयावया करताना भासतांत !

'नका खुडू, नका गाभाऱ्यात नेऊ, दिठीच पारणं फेडतंय बाळी, दृष्ट नका लावू' अगदी लहान बाळ डोळयासमोर येतं.... कधी चारच ओळींमध्ये तर कधी आठ आठ ओळींमध्ये ह्या फुलांमार्फत शब्दाद्वारे ते आपल्याला जीवनाचा मर्म सांगून जातात त्यामुळे प्रत्येक फोटो जिवंत झाल्यासारखा वाटतो.....

प्रत्येक फोटोत त्याच्या भावना दडल्या आहेत आणि त्या अलगद आपल्या ह्रदयापर्यंत पोचतात ते केवळ काकांच्या अफाट शब्दसंग्रहामुळे..... नकळत आपल्यालाही त्यांनी ही दृष्टी दिलीय... पदार्थ कितीही चविष्ट असला तरी त्यावर नारळ कोथिंबीर घालून सजावट केली की तो दिसतोही छान आणि त्याची चवही द्विगुणित होते तसेच काहीसे ह्या फोटोबद्दल मला वाटतं एकाहून एक सुंदर फोटो.... रंगसंगती, प्रकाशयोजना , योग्य कोन साधणं आणि त्यावर काकांच्या शब्दांच्या, काव्याच्या साजाचं लेणं ..... आहाहा त्या निर्जीव फोटोतल्या फुलांनाही आपलं जीवन सार्थकी लागल्यासारखा वाटलं असेल, वाटत असेल आपण भाग्यवान की ह्या अश्या साहित्याचा आपण एक भाग आहोत, आणि मला ह्यात समाविष्ट करण्यात आलं.... कौतुक करण्याऐवढी मी वयाने, मानाने खूप लहान आहे परंतु मला शुभेच्छा देण्याची संधी काकांनी दिल्यामुळे मी माझ्या भावना व्यक्त करू शकले.....काका, असेच लिहिते राहा, आम्हाला नवनवीन साहित्याची, शब्दांची ओळख करून द्या पुनश्च मनःपूर्वक आभार! मनःपूर्वक शुभेच्छा!

आपलीच

सुकन्या कुलकर्णी मोने

सुकन्या कुलकर्णी मोने, B /3 ,Lachhman niwas, besides tendulkar hall,
Mogal lane,mahim
Mumbai 400016
sukanyamone@ rediffmail.com
सुकन्या मोने : 9821119193

चित्रकार सुहास बहुलकर

सुहास बहुळकर
विलेपारले, मुंबई
२६ मे २०२०

या जगात काही माणसं वेडी असतात, म्हणजे ती कशाचा तरी ध्यास घेऊन, वेड घेऊन जगतात. माझे खूप जुने मित्र अरुण काकतकर हे त्याच पंथातले. दूरदर्शनसारख्या दृश्य माध्यमात अगदी सुरुवातीच्या काळात काकतकर आणि त्यांच्या त्यांच्या मित्र मैत्रिणींनी जे कार्यक्रम केले त्यांनी आपण सर्वजण सुखावलो... संपन्न झालो. आज इतकी वर्षे उलटली असली तरी अशी माणसे त्याच उत्साहानी सतत काहीतरी करत असतात. अगदी कोविड १९ या विषाणूच्या धुमाकुळात... काहीतरी आगळं-वेगळं करून पाहतात.

खरं तर काकतकर हे दृश्यमाध्यमामधील संपन्न व्यक्तीमत्व आणि आत्ता त्यांनी जे केलं आहे त्या उद्योगात त्यांना साथ देणाऱ्या कवयित्री आसावरी काकडे या शब्दप्रभू... आपल्या भावना, कल्पनांना प्रतिभेचा स्पर्श देत काव्यरूपातून सहज साकारणाऱ्या! पण प्रतिभावंतांना कधी काय करावंस वाटेल हे सांगणंच कठीण असतं. रवींद्रनाथ टागोरांना वृध्दापकाळी शब्दांपेक्षा आकार खुणावू लागले आणि ते चित्रनिर्मितीत रमले.

असंच काहीसं अरुण काकतकर आणि आसावरी काकडे यांच्यात २०१६ पासून घडलं. गेली साडेतीन चार वर्षं आसावरीताई त्यांनी काढलेलं एक छायाचित्र काकतकरांना पाठवत आहेत. कधी ते फुलाचं असतं, तर कधी विलक्षण रंगसौंदर्यानं नटलेल्या पानांचं! कधी

ते विविध ऋतूतल्या विविधरंगी आभाळाचं! कधी सूर्यास्ताचं तर कधी चंद्रोदयाचं! मला तर प्रश्नच पडला की हे रोज असं सापडतंच कसं या आसावरीताईंना? एकदा आसावरीताईंनी एक जास्वंदीच्या फुलाचं छायाचित्र पाठवलं, पाकळ्यांवर दवबिंदू ल्यालेल्या... ते बघून काकतकरांना शब्द सुचू लागले, ते लिहिते झाले. जणु काही त्या जास्वंदीच्या पाकळ्यांचं मनोगतच...

आता कसं छानं वाटतय, आभाळमायेनं घातलयं खाऊ
माणकांची बिंदी मिरवत, सांगा आता मी कुठं जाऊ?

पण एवढ्यावरच न थांबता कवी त्या पानांना सुनावतो

निथळून सारा गेला जलभार, तरी अंचलीं रेंगाळलेत चार
वारा धसमुसळा जर आला, मातीत पडून व्हत्याल गपगार

असे निसर्गाचे असंख्य आविष्कार आणि विभ्रम हे दोन सन्मित्र सातत्याने अनुभवतायत... त्यात रमतायत, खरोखरच हा एक यज्ञच आहे
" दृश्य व काव्य कलेचा!"

हळूच कधीतरी या यज्ञात अजून दोघांनी भाग घ्यायला सुरुवात केली. त्यातले एक चित्रकार राम केळकर... त्यांनी आपल्या चित्रातून आकाश आणि पाण्याचं नातं उलगायचा प्रयत्न केला. मग काकतकरांनीही दाद दिली...

हे आज असे का स्तब्ध उभे भवताल
थांबला निमिषभर त्रिखंडी अखंड काळ

पण तेवढ्यावरच न थांबता कवीला त्याचं कारण देखील सांगावसं वाटलं. ते होतं...

सांगू पाहती परस्परांना गूज
साक्षीला ठेवून निमली प्रसन्न सांज

अर्थात हे शब्द आहेत ते त्या सागरात उभे असणाऱ्या दोन प्रेमीजीवांच्या भावभावना व्यक्त करणारे

छायाचित्रं, चित्रं आणि शब्द यांचा प्रवास इथेच थांबत नाही. त्यात हळूच प्राणी आणि पक्ष्यांचाही विहार सुरू होतो तो मिलींद सबनीस यांच्या छायाचित्रातून... आणि काकतकर एका छायाचित्राबद्दल जे शब्द लिहितात त्यातून तर संत काव्याचीच अनुभूती येते.

डोळे जळांकावर, बिंब कृष्णविवर,
रंगांचा अवघ्या वावर, गिळो पाहे.

मग मनात आपोआपच विचार येतो कि 'यात माणूस कां नाही?' आणि त्याचं उत्तरही मिळतं... हे सर्व निर्माण करणारी माणसंच आहेत... अत्यंत संवेदनशील आणि जे त्यांनी निर्माण केलंय ते अनुभवणारे आपणही मानवच आहोत की!

पण त्यासाठी हा अनुभव मुद्दाम वेळ काढून घ्यायला हवा. चला या छायाचित्र, चित्र आणि शब्दांच्या दुनियेची सैर करूया.



अर्पण पत्रिका

‘माझी दृक्श्राव्य अनुभवसिद्धता अल्पाक्षरींत व्यक्त करण्याची क्षमता, आणि माझा शब्दसंग्रह, प्रथितयश विद्वान साहित्यिक कलावंतांच्या सहवासानं समृद्ध आणि संपृक्त करण्याची सुवर्णसंधी देणाऱ्या दूरदर्शनच्या पहिल्या पायरीला मी ही ‘चित्राक्षरी’, विनम्रपणे समर्पित करतो..’

अरूण काकतकर


# चित्राक्षरी


पांढऱ्या टिंबांची
लांबलचक चोच
पाण्यांत खोलवर आहे
तिची पोच
त्यांतलांच लागलेला
गांठीला बांधून
पंख पसरंत वेगानं उडेल
झेपावून
टोच टोच टोचून
करेल हैराण
माशांचे कंठाशी
येतील प्राण
जळाला मग बिंबाची
भ्रांत
तरंग होतील
शांत,शांत
Black Winged Stilt


कर्मयोगी कार्यरत
किडे मुंग्यांच्या शोधांत
शमविण्या भुकेची भ्रांत
अनादिकालीन



Painted Stork
उचलून पाय
हळूंच एक
वेधेल भक्ष
प्रवाही जळांत
साळसुदीचं
पांघरून ढोंग
भेदेल लक्ष
पुढच्यांच पळांत


किडे, मुंग्या वेचीत
जपून ठेवोनि चोचींत
बळ पंखांत भरून घेत
उडायाचे घरट्याकडे
नित्यनेम ज्याचा चुकला
क्षुधाशमना जाणा, मुकला
आप्तांसवे स्वतःही भुकेला
राहील खचित



कोणिही दिसेना समीप भवतालांत
प्रतिबिंबाची सोबत केवळ
जळपृष्ठांत
परि दूर जरा जातांचि मीही एकटा
श्वापदां हिंस्त्र, ना मिळतिल
अघोर वाटा
कल्याणकारि हे
ठरुंदे एकांडेपण
चित्कार आर्त वा
नकोच अरण्यरुदन
भंगूनी शांतता
किलबिलुदे वनराई
भूतां परस्पर
मैत्र होउंदे स्थाई


नावांत 'ऋषिवर्य'
पण वृत्तीनं
क्रूर नी लबाड
सहचरांची अंडी
हेच याच्या
भक्षाचं घबाड


फांदीवरची पकड मजबूत
शेपटाचा झोल डौलदार
चोचींत धरलय फळ इवलं
पण सावध नजर धारदार
पंख मिटल्या पाठीवर
खवल्या खवल्यांची नाजूक नक्षी
कोण्या कसब्यानं टिपलय अद्भुत
नी मांडलय सर्वांना करींत साक्षी ?


काळयंत्र ! एक कल्पना,भास
कळ दाबतांच भूताचा प्रवास
भविष्य ? उत्कंठेचा अदृश्य प्रदेश
काळीज धडाडत करूं पाहीलंच प्रवेश..


मागे पुढं वळवून मान
बघ, कुणीही दिसणार नाही
तुझ्या असीम साम्राज्यांत
आतां शांततेची ग्वाही
हडबडलेली माणसं पाहून
सारं आजच घे हसून
कौतुक करायला नसतील उद्या
उपयोग आसवं ढाळून


ऐलपैल गर्द रान
मधे खळाळ बेभान
भुऱ्या डोंगरावरून
देही ओथंबले घन
जळ लोळे जळावर
लाटा आवेगी अपार
खोळंबला दूरवर
कवळण्यासी सागर



Black Kite
एकाग्र देहांतर
रोखोनी ताठ कणा
लक्ष भवताली येता
पाठलाग जीवघेणा
बळकट विलक्षण
पायी पकड पंजांत
नखलोनी सोलेल
चीरफाडोनी चोचींत


जुळून आलींत मन,
पण देहांत मात्र अंतर आहे
परिस्थितीचा डंख असा कीं
मधून नुसतं वारं वाहे



Indian Spotted Owl
दिठी अर्धीच मिटोनी
नको होवूं बा एकाक्ष
पांघरती ढोंग जेथे
तो नाही तुझा पक्ष
मिटो पापण्या पाहाती
झोप छकुल्याला आली ?
दिवाभीता उजेडाने
की शुद्ध भोवळली ?


हे आज असे कां
स्तब्ध उभे भवताल
थांबला निमिषभर
त्रिखंडि अखंड काळ
सांगू पाहती
परस्परांना गूज
साक्षीला ठेउन
निमती प्रसन्न सांज



तसेहि तुटणे
नसते सोपे
पोकळीमध्ये
जिणे कांपे
भग्न अनाम
नात्यांची रोपे
जळून जाती
गर्भांत..


पहिल्या पावली
कुणा सुखाचा घोट
कुणापाठी
फक्त वेदनेची मोट
कुणापुढं कसनुशी
काजळमाया कराल
रगडून टाकेल
जर परतूं पाहाल


काळा बुरखा
डोईवरि परि
पंखावरती
गर्द निळा
मिटल्या चोंचिंत
लपल्या तरिही
कंठी अद्भुत
गान कळा



जिणंभर सुख दु:खांचे भोग
सरत्या अखेरी आठवांचा रोग
अनुभव कालौघांत नाशवंत अस्थाई
उत्तरायूंत केवळ चरचरणाऱ्या सईं


कुठलांच विषाणू इथं
धरणार नाही बाळसं
कारण, इथं अधांतरी बेटावर
येणारच नाहींत माणसं
हक्काच आमचं आता
लागेल परत मिळायला
कारण
संतप्त भूतंच लागलींत
मनुष्यत्व गिळायला



वादळे लागली हळूंहळूं ओसरू
लाटांची लयींत येरझार जाहली सुरू
होते हे स्वप्न कि जिणे जाणतेपणे
कां काळिज पाहे आळवु सुरेल गाणे
घेतांना शोध सुखाचा वणवण फिरणे
हे असेच असते सामान्यांचे जगणे
फाटल्या शिडाचे तारू भरकटलेले
फुटले, दुःखाच्या बेटाला लागले
घन राई काळोखांत, हसे भेसूर
सोबतीस झंजावाताचा बेसूर
साठवूं पाहाता उरांत उरला धीर
लुकलुकत्या ताऱ्यांचा वाटे आधार
आज वा रोजचा विझूं विझूं जाईल
साकळ नि सईचा रिता रिता होईल
झालेल्या जखमा खोल खोल असंतांत
काळाने नंतर खपली वर धरतांत
व्रण मागे ठेवुन उडूनि जाते कोणी
वेदना आळवे आर्त स्वरांची गाणी.
सोबती सख्यांची साथ सलतं संपते
शब्दाचे उरते कवितेपुरते नाते


हिरवाईच्या अंजुलींत
चार प्रीतरंगी
रंगभेद दिठीच्या मिठींत
योग्याचा करील भोगी
लवते न लवते पापणी
तोच तपोभंग होईल
अलवार झाल्या स्पर्शसुखानं
मन मोहरून जाईल


आपल्या आपल्यांत हरेकजण
अगदी एकटा असतो
मिळालं ते रंग रूप
कुरवाळंत बसतो
वाटेंत येईल त्याला झोंबते
झुळूक थंडगार
हळूहळू लुटत राहाते
सजलेला संसार
कायेवरच्या काटे केवळ
करतांत सोबत बोचरी
देठ हिरवा वाट पाहात
फुटत राहातो उरी



गोरी गोरीपान
सगळी फुलं कित्ती छान
हिरवाईच्या कुशीत
विसावली छकुली सान
खुडून नेईल कोणी
नी मिरवतील प्रहरभर
सांजेला विसरुन जातील
कोमेजल्यावर
माया ममतेनं जिथं
भरवला जातो घास
थकल्या भागल्या देहानं घ्यावा
तिथं शेवटचा श्वास


डोईभर ल्यायलाय हिरवा पदर
पाळीत मोतीयांची मोहक कुडी
परतीच्या पाउलवाटेनं पळत
येरवाळीच कुठं निघाली लाडी ?
रातभर तेवत दिठीची ज्योत
टक्क ठेवली पापणी आड
कुणा सटवीबरोबर कायजाणं
रगेल रंगेल माझा रमलाय द्वाड


पूर्णोन्मलित रसरशींत कांही,
ताजी तांबडी लाल
झुडुपांत निजल्यांत कांहीं कळ्या,
पानांची ओढून शाल
पायवाट नी पायऱ्या साऱ्या
तृणपात्यानी झाकल्यांत
पांथस्थाला दूर, वर न्यायला
तिथंच निस्तब्ध थांबल्यांत
रवाची साधी चाहूल नाही,
भवताल निश्चल विलक्षण निवांत
दिसावं कुठंतरी वाटतं राहातं
झुळुकेंत कांहीतरी हलतं


निशेंतुनि जेवि उमले
क्षितिजावरी रसरसले
कृष्णविवर तेवि झाकोळले
प्रभामंडळें प्रीतरंगी
अवलोकिण्या अजब सोहळा
राने अवघी झाली गोळा
अलौकिक अनुभव आगळा
प्रतिबिंबिते दिठीदिठी



निरखूं
पारखूं
दूरूनच
सुगंध लुटंत
हरखूंया,
भान हरपूं या !
उमलूं देत
कळ्या,फूलं
वल्लरींची
सानुली बाळं
वनराईनं
माळलिये मोगरी
जपा,
नाइतर खुडतील
पोरी
नका लावूं
हात उगा
जा,
सगळ्यांना
बजावून सांगा



बाकी टपकली शेजारी,
मी नाही पडलो
अजून तरी मायेसंग
तिच्या कुशींत आहे तगलो
कुणी अमानुष
रसिक(?) येईल
काठी वाकडी घेऊन
मायेला ओरबाडंत उगा
मला नेईल खुडून


उमलताचि हसत हसत
पसरति 'परिमला' होतं
खुडिले जर नाहि कोणि
पाहायची चांदरात
परि स्वप्ने कां पहावि ?
कुणि ना देणार हवी ?
माळुनी कोमेजतांच
देह निर्माल्ये व्हावी !
खेळत सारेंच डाव
अंकुरतो लढत जीव
मरण कुंपणापाशी
आपेआप सरे धाव


वल्लरी अंकावर कांही कळे
कांही पूर्ण फुलंत उमललेले
मोहांत पडून दिठींत जरी साठले
तरी तिथेंच बरे हसंत राहिलेले
खुडून धातूं वा दगडाला वाहाल
श्रेयासाठी बळी प्रेयाचा द्याल
वाट पहांत कृपेची जर बसाल
निबिड आरण्यांत वृथा फसाल


कीं 'त्यांच्यां'त
लाजलं कीं
लागतांत
असे आगळे
रंग व्यायला ?
इतका कसला
आलाय राग ?
अगदी निळं
जांभळं व्हायला


बेचकींत बसल्ये जाउन
कुणावर रुसून ?
कीं उबेचं दूध पितेय
सावलींत बसून ?
वेध आहे घेत
झेप खारोटीवर'
'मनी' माउच्या बेत
बेठकींतला डौल पाहून
हसू येतय खूप
हुप्प्या आला एखादा तर
सगळंच वाजेल सूप




झेपावतय कां नाय पंख पसरून ?
निजलयं धाकटं वाट पाहांत
हिरव्या उबेंत गुरफटलेलं
व्हायचीये अजून त्याची पाहाट

आभाळमायेनं कवळलं तरी
शिखा मोकळी कशी राहील ?
दमल्या भागल्या काळजास्नी तिथं
नवं ऊमलंत उभारी देईल



नक्षीदार साजांत रंगलों पणतीं
तेच परि तेल नि इवल्या वाती
काजळमायेंत मग फडफडती
तमारि होय ज्योत


धवल क्षीरनिधी शांत
सुमनपात्रि वोसंडत
चित्तवृत्ति प्रफुल्लित
करि आपेआप
कोंदण
हिरवे
भवती
केसरलडि
ऊर्ध्वगती
दृश्यवर्णनासि
मती
कोतीचि
ठरेल


गड्यां हो ! दृढकरें धरून
राहा एकमेका
किणकिण मधुनादें द्या
परस्परां हाकां



आहे इवलं पाखरूं
पिवळ्या मोहक रंगाचं
हिरवाईत, कसं लपलय छान
फूल करून देहाचं
वेध घेईल दिठी
नीट पाहा निरखून
जाल जर खुडायला
तर जाईल भुर्रकन उडून


जितकं आखीव रूजवलय
तितकंच रेखीव उमललंय
मोकळून पसरले पात्यांचे पांख
पाहून काळजं घायाळ
हकनाक
मधे हाय हुबा सोट सरळ
वाकड्या नजरांचं वाराया गरळ


धरतीच्या प्रीतविरहांत
जागलाय जनूं रातभर
रडून थकून गेल्या दिठींत
उतरलय तांबर
चुंबाचुंबी सरल्यावर
बदलेल सारा रंग
वन्हिवत माध्यान्ही
अनंगाचा मुखभंग
थकली सांज रागेजली
क्षितिजांवेरी नेईल ओढून
दुराव्याचा जाळ गाईल
अभोगी, दरबारीची धून


वक्रशुंड,
मुदित सुमुख
कर्ण सदा
श्रवणोत्सुक
सर्वांगें
करि नर्तन
पैंजण मधु
किण
किण
किण
अंतःचक्षूं उघडित
इष्टरूप साकारित
राहूंया जगत जिणे
घडी घडी सार्थ करित


इवली निळी तोटी
देइल मखमलीला पाणी
चिंब होऊन तिळं त्यांत
हसत गाइल गाणी
गुलाबी झबली घेरेदार
थाट तरी किती
सुवर्णाची बिंदी शोभे
तीघींच्या माथी


फेर धरली पान पाहातांयत
बदलून आपले रंग
पण हे सानुलं बाळ मधोमध
आपल्याच नादात दंग
तळ्यांतल्या 'त्या' कुरुपाची
सय जागवा जरा
आगळा अखेर ठरला होता
जो राजहंस खरा



पाते कुणि तोडिले
ताठ मानेचे
जरि कुंपण होते
भवती सवंगड्यांचे
उमलेल्या कळ्या फुलांना
भोगायाते
कुणि संपविले
असुयेने अतूट नाते ?



आम्ही
जुळ्या
धम्मक
पिवळ्या
कवळ्या
कळ्या
उमलण्या
आतूर


खुडूं नका, तोडू नका
नकां गाभाऱ्यांत नेऊं
दिठीचं पारणं
फेडतेय बाळी
तिला दृष्ट
नका लावूं



सुखदायी रंगसंगती
आणि साधलेली त्रिमीती
येते ठाईठाई प्रचिती
कसबाची, भूतांच्या
हरघडी गर्वहरण
पाहूं जाता हरपते भान
आकृतीबंध, योजन
अविरत, भूतांचे
लपले केंद्री आहे कोण
शिरावर किरिट धारून
बाहू पसरुनी दोन
बाहताहे



समृद्धीच्या पोटी,
प्रसवले तेज
भूतांचेची राज्य
सर्वदूर
रचनेचा तोल,
विलक्षण, लोभस
रंगसंगतीही खास
साधिली भूतें


प्रीतरंगी शालू शेला
गळा मोतियांचा सर
बिंदित माणिक कोंदुनि
कुठे नटुनि जाय नार ?
चक्षूंनी न्याहाळींत
किंचित अंतर राखा
जवळिक जर ‘साधु’ जाल
अनुभवाल अग्निशिखा



नाही कोठेही ओहोळ
नसे साकळले जळ
प्रतिबिंबांचा आकळ
व्हावा कैसा
कीं हे भासते प्रतिविश्व
वा हा स्वप्नाचा संभव ?
अपूर्त उचंबळाचा उद्भव
निद्रा नशेंत, अंतरीच्या ?


माथी लेऊन तारा, देहांत भरून
वारा
रानाईच्या कुशींत जीणं खरं
यांचं विश्व
ज्यांनी आणून घरांत छान
रुजवलं जोजवलं
फुलून त्यांना सुखावायचं पूर्त
होतय कर्तव्य


असीम फलकावर आभाळाच्या
कुंचल्यानं रंगधून छेडायची कशी ?
उंच माड नि शेजारच झाड
सांडल्या शाईतच पडले फशी
निद्रावश निशेच्या निळ्या
स्वप्नांत
उषेचा स्वरविलास विरघळतोय
तम तेजाच्या अद्वैतांत
संधीकाल
काळजांत
जांभळा धूप जाळतोय



पदर निळाईचा धरून
संग निशेचा सोडून
फांदीपांदीं भारतय आभाळ
प्रीतवसन वेढून
चढत जाईल
अंगांत झिंग
लागता फिरायला
राहाट
चटके जिण्याचे
बसूं लागता
विसरायला होते
पहाट



देखणा गब्रू कां सुस्तावलाय
पंख घट्ट मिटून ?
की टेहाळत वेध कसला
घेतोय फांदीवर बसून ?
थोडा वेळ थांब राजा
भरून घेतो दिठींत
मग जा उडून सखीच्या
आसुसल्या मिठींत.


यौवनसुलभ
कसुन विळखा ।
एकरूप
सखी- सखा ।
अनन्यसाधारण सुखा ।
बेभानाद्वैत
भोगताहे ॥


इतक्या सुबक विणकामांत
अडकला जरी जीव
जाळ्यात शांत पडून राहीन
जरी केलींत कीव
मोहक गोड पाशांत
जर असं ओढलं कुणी
सैल सोडून काया सारी
नशेंत गावी गाणी



जळवंती वा धरासंचरिणी ।
सीमेवर दोन मैत्रिणी ।
परस्परांची गूज, गाऱ्हाणी ।
सांगती पेरित हसूं-आंसू ॥
निरव शब्दरूप ल्याला ।
अव्यक्त 'बोलूं' लागला । कल्पनापिसारा फुलला ।
सुखावतां दिठी ॥


विस्तारोनि अजस्र अंग ।
निर्मिला तरुवरांनी सुरुंग ।
नागिणीचे शीतळ अंग ।
तिरिप भोगल्या पांथस्थां ॥
वेदनोत्तर शमन ।
भूतांचेचि नियमन ।
परि तोवरी हरेक क्षण ।
जीवघेणा भासे ॥


कुंचला कशाला ?
काय चितारायाला ?
येईल कुणी ?
रंगारी कसबी कुठला
की भोग कुणाच्या
ललाटि रेखायाला
धाडिला कुणी
सांगावा सटवाईला ?
झगमगे निळाई
हसत अताशा रोज
कां अशी अचानक
रया हरपली आज ?
कीं गूढच राहिल
व्यथा, वेदना, गूज ?
अशुभाची येई
कानी उगांच गाज



शोधा कुठं सापडतोय कां
पहा बरं राघूं
दिठी तीक्ष्ण वेध किती
घेतेय अजून बघूं


सानुल्याला कवळायाला
आयाबायांची चढाओढ
मधे धरून ठेवत त्याला
करताहेंत कौतुक कोड
हुंबऱ्यांवर हुबा हाये
त्येचा जिवाभावाचा सखा
वाऱ्यागत ह्यो निसटून जाइल
बायांनो ! फुका डांबू नका


कबऱ्या भुऱ्या शुभ्रांची
मांदियाळी वारींत
आकारांच्या परी पळतांयत
मेघावळीला वारींत
उगवतीचा भगवा लाल
मावळत हळूं जाईल
निळं, निर्मळ, निरभ्र, नितळ
दृग्गोचर होईल


चोंच नि चक्षूं
अल्याडपल्यांड
नाजुकसं दडतया
पाना आड
पायाची पकड पाहा
कशी आहे पक्की
काय वेधायचंय
याला नक्की ?


पंख झेपावलेले मिटून
शोधली मोकळी धरा हेरून
माजलयियेत रानं दूरवेरी
विसावली साद
पोहोचेल त्यांतून ?



जळबिंदूचे भिंग
पर्णपृष्ठाचे अंग
नि नसांचे अंतरंग
कोण्या हेतु वेधताहे ?



आकाशी झेपावलेले
अस्पष्ट कांही
कांही विसावलेले
शाखशिखेवर
कोण्या देशीचे कसे
नेमेचि येतांत
विविध परींचे
लोभस द्विजवर
वेध दूरचा
घेत कांही
कांही
क्षुधाशमनी व्यग्र
कर्मयोग्यांची
मांदियाळी
कार्यरत
अविरत
समग्र


कवळून आवळून
झोंबत द्वैतां
अद्वैताचा
साक्षात्कार
भिंती किती
उभाराल भवती
आवेग आहे
असीम अपार


काळोख वारायला
फडफडतेय पणतीं
तींत मिणमिणती
एक इवलील्ली ज्योती
स्नेहमयी वात
कणाकणानं जळेल
तृष्णापूर्त दिवा
तोवेरी उजळेल
असंच असतं आपलं
चार घटकांचं जिणं
विझूं विझूं अंधारलं
की उरतं केवळ समर्पणं


कांही हिरे,मोती कांही,कांही वैडूर्य
पाचूंना पैलूं पाडणंतर कसबाचं
ऐश्वर्य
किती किती रत्नांच्या
झेलाव्या सरी
कुबेराचा जवाहिरी करतोय
खाली तिजोरी



तरुवराच्या
शाखाकृती ।
भाव मुद्रा
रेखाटती ।
अवर्णनीय
कलाकृती ।
साधिली
आपेआप ॥
कपोलावर शशिबिंब । की
क्षीराचा राहिला थेंब ?।
वोसंडल्या उचंबळाचा कुंभ ।
कीं आभाळमायेच्या ?॥
ask



तहानल्या शुष्क कंठांत
रित्या करून अमृत धारा
कानांत वारं भरल्यागत
आभाळभर उधळलाय मेघपिसारा
दृष्ट कुठं न लागो म्हणून
हळूंच मायेनं रेखलिये तीट
झेपावलं इवलं पाहा
आपसूक आज झालय धीट


पसरोनी पसा एकटा
हा मागतो
पसाय
निष्पर्ण शाखाशिखेवर
निश्चयाने
ठाय
अंजुलींत पडली
अमृतधार
सर्वांगी रुजवली
नसानसांत भिनवून
यानं
नवी हिरवाई
सजवली


प्रीतरंगी सुमने
की कवळे फुटवे जोमाने
आकर्षिति सहजि मने
शाखशिखारूढ


भारद्वाजादि द्विज
धरेवरी उतरले आज
सार्थण्या दिठीचे काज
मनुष्यांच्या
पक्षी गोमटा सुंदर ।
कृत्यांत महा अघोर ।
अन्य खगांच्या बीजांडांवर ।
करि गुजराण ॥


इतकी छान निळसर गुलाबी
चहूबाजूंची भिंतं
काडी काडी वेचून रचायला हवं
साजिरं गोंडस घरटं
पानगळींतून वाचल्यांआड
शोधाया हवी पांदी
मग निवांत ठेऊन पिलं आंत
झेपावेन आभाळामंदी


कुठल्या नशेंत बाबा
जीवमात्रांना दावलीस निशा
रक्त पिऊन हाडं चघळंत
आता पुसत बसलायस मिशा

ये भानावर, बघ संहार
मनुष्यत्वानं केलेला प्रतिकार
कळिकाळाला देत मात
होतायत एकमेकांना आधार

असे छप्पन पावसाळे
आधी भोगून झालेंत सगळे
बांध काळजाला घालून पुन्हा
वेठीस धरंच साकळली जळे

# चित्राक्षरी

भाग २ – लवकरच...

एक चित्र किंवा छायाचित्र हजार शब्दांहून अधिक काही सांगते असे म्हणतात. महाराष्ट्राला तर चित्रकारांची व छायाचित्रकारांची फ़ार मोठी परंपरा आहे.

परंतु चित्रांची पुस्तके मराठीत (काही सन्माननीय अपवाद वगळता) कमीच. याचे कारण व्यावहारिकता. त्यांना येणारा खर्च.

ई साहित्यने मात्र इंटरनेटच्या खुबींचा फ़ायदा घेत चित्रकलेची पुस्तके प्रकाशित करायला घेतली आहेत. विवेक मेहेत्रें, डॉ. शशांक परूळेकर, मयुरेश कुलकर्णी, आसावरी काकडे, प्रज्ञा हरणखेदकर, संदीप देवल यांची चित्रांची पुस्तके यापुर्वी प्रसिद्ध केली आहेतच. आज आसावरी काकडे यांचे छायाचित्रसंग्रहाचे पुस्तक प्रकाशित करत आहोत. या ही मालिका अशीच सुरू राहील आणि नवनवीन व्यंगचित्रकार या मालिकेत सहभागी होतील. महाराष्ट्राची व्यंगचित्रकारांची परंपरा अजूनच बहरेल याची आम्हाला खात्री आहे.

अशाच इतर पुस्तकांसाठी खालील लिंकवर क्लिक करा.

http://www.esahity.com/23302367234023812352232523542366.html

